# कोविड १९ च्या काळात सामाजिक विकासात आधूनिक ग्रंथालयाचे महत्व

**शुभम संजीव मासुरकर**
सहाय्यक ग्रंथपाल
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर
८६६८३६६८६५
masurkarshubham87@gmail.com

---

**सारांश:—**

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये फिरते ग्रंथालयाचे महत्व सांगण्यात आले आहे. व फिरते ग्रंथालयाचे फायदे आणि ग्रथावाहन याबद्‌दल माहिती संगितली आहे. सामाजिक ग्रंथालयाचे महत्व पटवून ग्रंथालयाचे बदलते स्वरूप यावर चर्चा केली आहे. २०१९ पासून कोविड १९ या महामारीमुळे फिरते ग्रंथालयाची प्रत्यक्ष अमलबजावणी करताना अनेक अडचणीचा सामना करावा लगत असल्यामुळे यावर उपाय म्हणून डिजिटल ग्रंथालयाच्या साहाय्याने वाचनसाहित्य आणि वाचक याच्यात मेळ घालणे सहज शक्य होऊ लागले. या संदर्भाचे प्रस्तुत लेखात वर्णन केले आहे.

**प्रस्तावना :—**

आजच्या डिजिटल युगात ज्ञान ही एक शक्ती आहे. त्यामुळे असा ज्ञानसंग्रह व त्याच्या उपयोग करण्यासाठी ग्रंथालयाची निर्मिती झाली आहे. ग्रंथ, ग्रंथालये ही मानवी जीवन समृध्द करणारी ज्ञानभंडारे आहेत. व आजचे युग हे माहितीतंत्रज्ञानाचे युग आहे. माहितीतंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे माहिती वेगाने माहिती वेगाने निर्माण होत आहे. या सर्व माहितीची भर ग्रंथालय संग्रहामध्ये पडत असते सुरूवातीच्या काळापासून ग्रंथालयात विविध सेवा देण्यासाठी वेगवेळ्या तंत्राचा वापर केला जात आहे. त्या सर्वाना काही प्रमाणात मर्यादा पडतात. संगणकामध्ये माहितीवर प्रक्रिया करण्याची असलेली क्षमता, अद्ययावतता, माहितीची साठवण व उपलब्धता यासाठी या साठी लागणारा अव्यय वेळ, विविध प्रकारे नेमक्या माहितीचा शोध, माहितीच्या आदान, प्रदानाला कमालीचा वेग, वापरकर्त्यास सुलभ अशा विविध कारणामुळे ग्रंथालयात संगणकाचा उपयोग सुरू झाला. त्यामुळे ग्रंथलयातील दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, दस्तऐवज इ. असे दुर्मिळ वाचन साहित्य वाचकाला किवां संशोधकाला गंथालयाबाहेर देता येत नाही. कारण अशा दुर्मिळ वाचन साहित्याचा कागद वातावरणातील बदलामुळे ठिसुळ झालेला असतो तेव्हा साधनांचा भविष्यात वापर करण्यासाठी अशा साहित्याचे डिजिटायझेशन करणे आवश्यक असते.

डिजिटायझेशन मुळे भाषा, वेळ, श्रम व पैसा या स्वरूपातील अडथळे दूर झाले आहेत. डिजिटल ग्रंथालय, ई ग्रंथालय व्हर्च्युअल ग्रंथालय या तीनही संकल्पनामध्ये फारसा फरक आढळून येत नाही. यामधील महत्वाचे साम्य म्हणजे वाचन साहित्य हे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवून ठेवले जाते. डिजिटल ग्रंथालय हे एक विशेष ग्रंथालय होय. त्यामधील डिजिटल स्वरूपातील संग्रहावर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे ग्रंथालये चार भिंतीत आणि कपाटामध्ये बंदिस्त न राहता ती सरळ वाचकाला हव्या त्या ठिकाणी उपलब्ध होऊ लागली आहे.

पारंपरिक ग्रंथालयामध्ये पुर्णत: माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा अभाव होतो. त्यानंतर हायब्रीड स्वरूपाच्या ग्रंथालयामध्ये इलेक्ट्रानिक माध्यमावर चालणाऱ्या साधनांचा संग्रह करण्यात येऊ लागला म्हणजे हायब्रीड ग्रंथालयामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव थोडयाप्रमाणात दिसू लागला आणि यापुढे जाऊन विसाव्या शतकात उत्तरार्धामध्ये पुर्णत: माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव ग्रंथालयावर होऊन त्या आधारित डिजिटल ग्रंथालये अस्तित्वात येऊ लागली आहे.

**सामाजिकरण –**

मानवाच्या मतांमध्ये अमुलाग्र बदल हे ग्रंथच घडवून आणू शकतात. या बाबतीत श्री. जे. सी. शेरा म्हणतात, ग्रंथालयातून मिळणारे ज्ञान हाच आपल्या संस्कृतीचा खरा आत्मा आहे. या ज्ञानाचा प्रसार ग्रंथालयामार्फतच समाजात होतो. ग्रंथालयामुळेच या लिखीत ज्ञानाचा प्रत्येक मानवाला वैयक्तिकरीत्या आणि समाजाला सामूहिकरीत्या फायदा मिळत असतो. कारण भूतकाळातील विचारवंतांचे विचार ग्रंथांच्या रूपात जतन केले जातात आणि अगदी काळजीपूर्वक पुढील पिढीला सोपविले जातात. म्हणजे ज्ञानाच्या प्रसाराच्या या प्रक्रियेत ग्रंथालयाविषयीची सामाजिक जाणीव होय. सामाजिकीकरणची संकल्पना आजच्या आधुनिक प्रवाहात बदलेली आहे. योग्य माहिती, योग्य व्यक्तीला, योग्य वेळी, योग्य प्रारूपात, योग्य उपयोगासाठी देणे अशी नवीन संकल्पना आली आहे.

**ग्रंथालयाचे बदलते स्वरूप –**

पारंपरिक ग्रंथालयापासून ते आधुनिक काळातील ग्रंथालये यांचा आढावा घेतला असता ग्रंथालयाचे पुढीलपैकी वर्गीकरण करण्यात येते.

- पारंपरिक ग्रंथालय
- इलेक्ट्रानिक ग्रंथालय
- स्वयंचलित ग्रंथालय
- हायब्रीड ग्रंथालय
- डिजिटल ग्रंथालय
- वर्च्युअल ग्रंथालय

सामाजिकरणमध्ये फिरते ग्रंथालयाचा फार मोठा वाटा आहे. ते पुढीलप्रमाणे .

**फिरते ग्रंथालय –**

लोकशाही असणाऱ्या देशातील प्रत्येक नागरिकाला चांगली ग्रंथालय सेवा देणे ही आता आवश्यक व सर्वमान्य गोष्ट झाली आहे. ग्रंथालयातून असलेल्या मोठया ग्रंथसंग्रहातून स्वत:च्या आवडीचा ग्रंथ निवडण्याची संधी त्यांना मिळाली पाहिजे आणि त्या निवडीसाठी जर अनुभवी ग्रंथपालाचे मार्गदर्शन व सल्ला त्यांना मिळाला, तर त्यांची सोय होऊ शकते.

लहान ग्रंथालयांकडे वाचनसाहित्याचा संग्रह लहान प्रमाणात असतो, त्यामुळे सर्व नागरिकांच्या आवडीप्रमाणे वाचनसाहित्य पुरविण्याची सेवा त्यांना देता येईलच असे नाही. कारण, त्यांचे कर्मचारी,

ग्रंथसंग्रह आणि आर्थिक सामर्थ्य कमी असते. वाचकांना मार्गदर्शन व्हावे म्हणून तज्ज्ञ ग्रंथपालाची नेमणूक करणेही अशक्य असते. अशा लहान व ग्रामीण भागातील ग्रंथालयांच्या समस्या सोडविण्याचे पुढील काही मार्ग उपयुक्त ठरतात.

- ग्रामीण भागातील वाचकांना जवळच्या शहरातील ग्रंथालयांचा उपयोग करण्यास अनुमती देता येते.
- पण सर्वानाच शहरात जाणे व परत येणे जमेजलच असे नसते. कारण, त्यातील काही वयोवृद्ध असतात, तर काही अपंग असतात.
- जिल्हा ग्रंथालयांनी काही निवडक वाचन—साहित्य लहान ग्रंथालयांकडे द्यावे काही दिवसांनी ते बदलून घ्यावे.
- ‘फिरते ग्रंथालय’ सुरू करणे हा एक मार्ग आहे आणि तो उपयुक्तही ठरू शकतो. हे एक ‘चाकांवरील ग्रंथालय’ ‘ग्रंथगाडी’ च्या स्वरूपात असते. त्याच्या मदतीने नागरी व ग्रामीण भागातील नागरिकांना ग्रंथालयसेवा देता येते. त्यासाठी अंतर्भागात ‘शेल्व्हज्’ बसविलेली गाडी असते व तिच्या दाराशी एक छोटा काउंटर केलेला असतो.

शहरात मध्यवर्ती ग्रंथालयातून निवडक ग्रंथ घेऊन, ग्रामीण भागातील नागरिकांना प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ग्रंथालयसेवा देणे अशी ही योजना असते. यासाठी एक ठरावीक दिवस व वेळ निश्चित करून, त्याप्रमाणे वेगवेगळया ग्रामीण भागात निवडक ग्रंथांसह भेट दिली जाते.

या ग्रंथालयातूनही घरी वाचण्यासाठी ग्रंथ देता येतात. ठराविक दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्यावेळी अर्धा तास, ही ‘ग्रंथगाडी’ थांबविली जाते. आधी दिलेले ग्रंथ परत घेऊन नवे ग्रंथ ठराविक मुदतीसाठी दिले जातात ही अतिशय सोयीस्कर ठरणारी ग्रंथ देवघेव योजना होऊ शकते. या ग्रंथालयाच्या संग्रहात निवडक संदर्भग्रंथाचा समावेश करता येतो. ती गाडी थांबणार असेल त्या वेळात, गाडीत अगर गाडीच्या जवळपास बसून, संदर्भ ग्रंथ पाहून, वाचक हवी ती माहिती मिळवू शकतात.

**अशा ग्रंथालयांमुळे पुढीलप्रमाणे फायदे होतात**

प्रत्येक गावातील स्वतंत्र ग्रंथालयांसाठी स्वतंत्र इमारत बांधणे, तिच्या दुरूस्त्या करणे व व्यवस्था करणे, यावर खर्च करणे, या गोष्टी टाळून बऱ्याच प्रमाणात बचत होते. म्हणजे कर्मचारी, कष्ट व खर्च याबाबत खूप काटकसर होते व ग्रंथालयसेवा मात्र अगदी अंतर्भागातील ठिकाणांपर्यंत पोचविता येते.

**वाहनप्रकार:**

लहानलहान खेड्यांपर्यंत जाणारे रस्ते फारच खराब असतात. म्हणून मजबूत पण लहान गाडी ‘ग्रंथगाडी’ म्हणून सोयीची ठरते. मात्र त्या गाडीत अंदाजे ५०० पर्यंत ग्रंथ वाहुन नेता यावेत. या ग्रथलयाच्या कर्मचाऱ्यांना बसण्यास व प्रवास करण्यास आरामशीर वाटेल अशा तऱ्हेने बैठकव्यवस्था त्या वाहनात असावी. वाहन जर उत्कृष्ट प्रकारचे असेल, तर ते सारखे बंद पडणार नाही व योग्य ठिकाणी पोचण्यास विलंब होणार नाही. गाडीत, आतमध्ये ग्रंथांची रॅक्स असावीत. वाचकांना आत जाऊन, उभे राहून ग्रंथ निवड करता यावी, पण जर गाडीच्या दोन्ही बाजूंना बाहेर उघडता येणाऱ्या दारांची रॅक्स बसविली तर, वाचक बाहेर उभे राहूनही ग्रंथनिवड करू शकतात.

**अशा या सेवा सुविधांचे प्रमुख फायदे पुढीलप्रमाणे असतात.**

- ग्रामीण भागातील सर्वसामान्य ग्रंथालयांपेक्षा १० पट जास्त वाचनसाहित्य या ग्रंथगाडीतून नेता व आणता येते.
- शाळा व महाविद्यालयांच्या सुट्ट्यांमध्येही ही सेवा सुरू राहते. त्यात खंड पडत नाही.
- दुर्गम भागातील रहिवाशांपर्यंत वाचनसाहित्य पोचविता येतो.
- लहानात लहान जनसमूहांपर्यंत ग्रंथालयसेवा देता येते. हे काम नागरी भागातील ग्रंथालयांना अशक्य असते.
- विशिष्ट मागण्या पुरविण्यासाठी, पुढील भेटीच्या वेळी, आवश्यक ते वाचनसाहित्य नेऊन, गरजा भागविता येतात.

**अशी काही फायदे असले तरी या योजनेमध्ये पुढील अडचणी येतात:**

- ग्रामीण भागातील प्रत्येक ठिकाणी साप्ताहिक भेटी शक्य होतातच असे नाही. त्यामुळे दोन भेटींमध्ये पंधरा दिवसांचे तरी अंतर पडते. त्यामुळे वाचकाची गैरसोय होण्याची शक्यता असते
- वाचनसाहित्याची ने–आण करणारी गाडी कितीही मजबुत असली, तरी ग्रामीण भागातील खराब रस्त्यांमुळे गाडीच्या जाण्यायेण्यात अडथळे येतात.
- गाडीच्या जाण्यायेण्याचे रस्ते चांगले असले तरी गाडीमध्ये यांत्रिक बिघाड होऊ शकतात.

**डिजिटल लायब्ररी म्हणजे काय?**

डिजिटल लायब्ररी आणि व्हर्च्यअल लायब्ररी या संकल्पना आज समान अर्थाने वापरताना दिसतात. पण वास्तवात मात्र या संकल्पना समान नाहीत. डिजिटल लायब्ररी ही एक अशी माहिती सेवा आहे की, ज्यामध्ये सर्व माहिती स्त्रोत संगणक वाचनीय स्वरूपात उपलब्ध असतात. ग्रंथोपार्जन जतन पुनप्राप्ती हा कार्य डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केली जातात. डिजिटल लायब्ररीच्या माहिती स्त्रोतामध्ये सी.डी. रोम, डेटाबेस, इंटरनेट, अर्काहिव संग्रह, प्रकाशकाचे डाटाबेस, दृक श्राव्य साधने, संगणक प्रोग्राम्स, मल्टिमेडिया इत्यादीचा समावेश होतो.

**डिजिटल लायब्ररीचे उद्दिष्टे**

डिजिटल लायब्ररीचे महत्वाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत

१. डिजिटल माहितीचे संग्रहन, संघटन व पुन:प्राप्ती करणे
२. माहितीचे जतन करण्यासाठी डिजिटायझेशन करणे
३. ग्रंथलयीन कार्याच्या खर्चाची परिणामकारकता सुधारणे
४. ग्रंथलयासाठी अधिक प्रमाणात लागणाऱ्या जागेची समस्या कमी करणे
५. वाचकांचा व ग्रंथालयीन सेवकांचा वेळ वाचविणे
६. नवीन सेवा सुरू करणे
७. देवघेव, ग्रंथोपार्जन, ग्रंथखरेदी आणि नियतकालिकांचे व्यवस्थापन यांसारख्या दैनंदिन कार्याची परिणामकारकता वाढविणे.

**इडिजिटल ग्रंथालयाचे फायदे:**

डिजिटल ग्रंथालय तालिकेचे अवलोकन करणे, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ग्रंथ प्राप्त करणे किंवा उसनवारीने मिळविणे, आपल्याजवळ संग्रहित करणे इत्यादी प्रक्रिया सहजगत्या शक्य होतात. इंटरनेट व ब्राउजरचा उपयोग करून डिजिटल ग्रंथालय केव्हाही व कोठेही उपलब्ध होउ शकते. डिजिटल स्वरूपातील प्रलेखाची एकच प्रत अनेक उपभोक्त्यांना वापरता येते. प्रलेखातील महत्वाचा आशय संघटित व सुरचित स्वरूपात उपलब्ध करता येतो डिजिटल डेटाबेस संग्रहातील कोणताही शब्द, वाक्प्रचार, म्हणी याचा त्वरीत शोध घेता येतो. डिजिटल ग्रंथालयामध्ये जागेची बचत होते. मनुष्यबळ कमी लागते त्यामुळे खर्चात बचत होते. दुर्मिळ ऐतिहासिक ग्रंथ, साहित्य उपलब्ध होऊ शकते. तसेच वेगवेगळ्या स्वरूपातील साहित्य जतन करता येते. उदा. ध्वनिमुद्रिका, चलनचित्र, व्हिडिओ चित्रफिती इत्यादी.

**डिजिटल ग्रंथालयातीलमध्ये येणाऱ्या अडचणी**

- विजेची अडचण
- भौतिक सुविधांचा अभाव
- निधीची कमतरता
- प्रशिक्षित सेवकांची गरज
- प्रशिक्षणाची गरज
- साधनातील त्रुटी
- बौद्धिक संपदा हक्क कायदयामुळे माहिती वापरामधील अडथळे

**निष्कर्ष :**

वाचकांच्या माहिती विषयक वेगवेगळ्या गरजा व वेगवेगळे दृष्टीकोन लक्षात घेता पारंपरिक ग्रंथालयांनाही आजच्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून घेऊन ग्रंथालयाचा विकास करणे गरजेचे झालेले आहे त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयाचे डिजिटाझेशन करणे आवश्यक आहे. आजच्या गतिमान युगात वाचकांना हवी असणारी माहिती वेळेत देण्यासाठी व तिची उपलब्धता आपल्या ग्रंथालयात करण्यासाठी डिजिटाझेशन गरजेचे आहे. आज माहितीचा विस्फोट, वाचकांच्या बदलत्या गरजा, तंत्रज्ञानातील बदलते स्वरूप इत्यादी करिता ग्रंथालयाचे डिजिटाझेशन करणे आवश्यक आहे

**संदर्भ सूची :**

१. पवार एस. पी. ग्रंथालय व माहितीशास्त्र, पुणे, फडके प्रकाशन.
२. नरगुंदे रेवती ग्रंथालय आणि सामाजिक विकास, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
३. फडके द. ना. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधूनिकीकरण, पुणे, फडके प्रकाशन.
४. https://ischool.uw.edu/programs/mlis/what-is-library-science
५. https://www.nios.ac.in/media/documents/SrSecLibrary/LCh-9H.pdf
६. https://vishwakosh.marathi.gov.in/22593/